




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25









अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३७ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । ०७/०६/२०२६ । पाने - ६







## शिवराज्याभिषेकाचा जल्लोष

### शिवरायांच्या जयघोषाने दुमदुमला रायगड



रायगड - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गदुर्गेश्वर किल्ले रायगडावर अभूतपूर्व उत्साह आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले. शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्रासह देश-विदेशातून लाखो शिवभक्त रायगडावर दाखल झाले असून, संपूर्ण गड भगव्या रंगात न्हाऊन निघाला आहे. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी अवघा रायगड दुमदुमून गेला.

शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक सोहळा नसून मराठी अस्मिता, स्वाभिमान आणि स्वराज्याच्या विचारांचे प्रतीक मानला जातो. ६ जून १६७४ रोजी याच रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. त्याच ऐतिहासिक क्षणाची आठवण जिवंत ठेवण्यासाठी दरवर्षी हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदाच्या सोहळ्यासाठी राजसदरेवरील मेघडंबरीची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली आहे. गडावर सर्वत्र भगवे ध्वज, पताका, पारंपरिक सजावट आणि शिवकालीन वातावरणाची निर्मिती करण्यात आली.

## संगमनेरातील कुख्यात टोळीवर बीएनएस १११ अंतर्गत गुन्हा दाखल

### कोयत्याच्या धाकावर लूट




संगमनेर (प्रतिनिधी)

संगमनेर शहरातील डी-मार्ट परिसरात मालवाहू वाहन चालकाला कोयत्याचा धाक दाखवून लुटल्याच्या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी मोठी कारवाई करत आरोपी टोळीवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील संघटित गुन्हेगारीसंदर्भातील कलम १११ लागू केले आहे. नव्या कायद्यानुसार करण्यात आलेली ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात असून आरोपींना आता कठोर शिक्षेचा सामना करावा लागू शकतो.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १.३० ते १.३५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी शैलेश नारायण शेलार (वय ३४, रा. खैरेवाडी, ता. निफाड, जि. नाशिक) हे त्यांच्या मालवाहू पिकअप वाहनातून कंपनीचा माल घेऊन नाशिकहून चेन्नईकडे जात होते. यावेळी संगमनेर शहराजवळील सायखिंडी फाटा, डी-मार्ट परिसरात नाशिक-पुणे महामार्गावर सहा अज्ञात इसमांनी चारचाकी वाहनाच्या साहाय्याने पिकअप आडवी लावून त्यांना अडविले.

आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करत लोखंडी कोयत्याचा धाक दाखवला. त्यानंतर त्यांच्या ताब्यातील सुमारे ९५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून नेला. या घटनेप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान या गुन्ह्यातील आरोपींची ओळख पटली असून आरोपींमध्ये अक्षय दादा चव्हाण (वय २१, रा. अकोले नाका, संगमनेर), रोहित ऊर्फ कोकण भिकाजी शिंदे (वय २५), संदीप ऊर्फ जब्या संजय वाल्हेकर (वय २५, रा. आठरापगड, गुंजाळवाडी), आदित्य संजय शिंदे (वय २१, रा. आठरापगड, गुंजाळवाडी), अभिषेक अशोक लोंढे (वय २२) आणि साई रामपुरी गोसावी (रा. अकोले नाका, संगमनेर) यांचा समावेश आहे. यापैकी आरोपी क्रमांक १ ते ४ यांना पोलिसांनी अटक केली आहे.

तपासात धक्कादायक बाब समोर आली असून आरोपींच्या गुन्हेगारी इतिहासात अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी अक्षय चव्हाण हा टोळीप्रमुख असून त्याच्यासह साथीदारांविरुद्ध दरोडा, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, घातक शस्त्रांचा वापर, गंभीर दुखापत, घरफोडी, चोरी, बेकायदेशीर जमाव, अनधिकृत प्रवेश आदी स्वरूपाचे तब्बल ३० गंभीर गुन्हे विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल आहेत.

या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, संगमनेर यांनी आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम (पान ४ वर)

## लक्ष विचलित करून वृद्ध शेतकऱ्याची पावणेदोन लाखांची रोकड लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - बँकेतून पैसे काढून घरी परतणाऱ्या एका वृद्ध शेतकऱ्याला चलाखीने जाळ्यात ओढत दोन अज्ञात चोरट्यांनी १ लाख ७५ हजार रुपयांची रोकड आणि सुमारे ३ लाख रुपयांचे धनादेश असलेली पिशवी पळविल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. ३) दुपारी पावणेदोनच्या सुमारास सुकेवाडी-कुरण रस्त्यावर घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून बँकेतूनच शेतकऱ्यावर पाळत ठेवून हा कट रचल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



सुकेवाडी येथील ६९ वर्षीय शेतकरी सुरेश बाळकृष्ण शेटे यांनी एका व्यवहारातून मिळालेल्या तीन धनादेशांपैकी १ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश संगमनेर येथील बँक ऑफ बडोदा शाखेत वटवला होता. मिळालेली रोकड आणि उर्वरित दोन धनादेश त्यांनी जेवणाच्या डब्याच्या पिशवीत ठेवून ती आपल्या ॲक्टिव्हा स्कूटीच्या हँडलला अडकवली होती. त्यानंतर ते कुरण रस्त्याने घरी निघाले होते.

(पान ५ वर)

**नागरिकांना पोलिसांचे आवाहन**

**बँकेतून मोठी रोकड काढल्यानंतर ती उघडपणे वाहनाला लटकवून न ठेवता सुरक्षित ठिकाणी ठेवावी. तसेच अनोळखी व्यक्तींकडून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न झाल्यास त्वरित सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.**

## मारहाण प्रकरणाला गंभीर वळण

**जखमी सलीम शेख यांचा मारहाणीत मृत्यू?**

### आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शहरातील सुकेवाडी रोड परिसरात झालेल्या सामूहिक मारहाण प्रकरणाला आता गंभीर वळण लागले असून या घटनेत गंभीर जखमी झालेल्या सलीम हारुण शेख यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, मृताच्या नातेवाईकांनी संबंधित आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याची ठाम भूमिका घेतली आहे.

याबाबत शहर पोलीस ठाण्यात सलमान हारुण शेख (रा. सुकेवाडी रोड, संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. ३१ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.१५ वाजेच्या सुमारास त्यांच्या घरासमोर काही व्यक्ती त्यांच्या पत्नी रुक्सार शेख यांना शिवीगाळ व मारहाण करत असल्याचे दिसून आले. याबाबत जाब विचारताच आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, अब्बू बकर याने लाकडी दांड्याने तर आवेश मिर्झा याने हाताबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच रुक्सार शेख यांचा दुपट्टा ओढून कपडे फाडल्याचा व महिलेशी गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या झटापटीत त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोतही हरवल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, फिर्यादीचा मोठा भाऊ सलीम शेख व त्यांचा तीन वर्षीय मुलगा हुजेब घटनास्थळी आल्यानंतर त्यांच्यावरही स्टीलच्या रॉडने हल्ला करण्यात आल्याचा आरोप आहे. यामध्ये सलीम शेख गंभीर जखमी झाले, तर लहान मुलालाही दुखापत झाली. फिर्यादीची भावजय महेक तोहसीफ खान तसेच आई जुबेदा हारुण शेख यांनाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. विशेष म्हणजे, तक्रार देण्यासाठी शहर पोलीस ठाण्यात गेलेल्या फिर्यादीवर पोलीस ठाण्याबाहेर पुन्हा काही आरोपींनी हल्ला करून मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. (पान ४ वर)











Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532 आजच संपर्क करा

24/7 Emergency Services

# शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप सुरू

## पशुपालक व शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

### आ.अमोल खताळ यांचा पुढाकार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना वर्षभर दर्जेदार हिरवा चारा उपलब्ध व्हावा तसेच जनावरांच्या वैरणीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, या उद्देशाने आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे. पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत असून तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना याचा लाभ दिला जाणार आहे.

सध्या बदलत्या हवामानाचा शेती आणि पशुपालन व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे. अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि चाऱ्याची कमतरता यामुळे पशुपालकांसमोर अनेक अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात हिरव्या चाऱ्याची टंचाई भासत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पौष्टिक, मुबलक आणि वर्षभर उपलब्ध राहील असा हिरवा चारा उत्पादनाला चालना मिळावी, या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वैरण पिकांच्या बियाण्यांचे वितरण करण्यात येणार आहे. या बियाण्यांच्या माध्यमातून शेतकरी स्वतःच्या शेतात चारा पिकांचे उत्पादन वाढवू शकतील. त्यामुळे जनावरांसाठी वर्षभर हिरवा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार असून पशुधनाचे संगोपन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. तसेच पशुपालकांच्या आर्थिक खर्चातही बचत होण्यास मदत होईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संगमनेर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन कार्यालयाशी अथवा तालुक्यातील २४ पशुसंवर्धन दवाखान्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी पुंडलिक येवले यांनी केले आहे.

**अनेक भागांमध्ये हिरव्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. काही शेतकऱ्यांकडे जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध असला तरी अनेक पशुपालकांना चाऱ्याअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे. पशुपालकांच्या या समस्येची दखल घेत पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतात दर्जेदार वैरण पिकविण्याची संधी मिळणार असून वर्षभर जनावरांसाठी पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध राहण्यास मदत होईल. पशुधनाचे आरोग्य चांगले राहून दूध उत्पादन वाढण्यासही हातभार लागेल. तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी आणि पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेऊन आपला पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम करावा.**

**आ. अमोल खताळ**

# कॉकरोच आंदोलकांचा दिल्लीत आवाज दुमदुमला






नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरव्यवहारांविरोधात शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात आले. विविध स्पर्धा परीक्षा आणि विशेषतः नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावरून 'कॉकरोच जनता पार्टी' च्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

मागील चार महिन्यांत देशातील अनेक महत्त्वाच्या परीक्षांमध्ये पेपरफुटी, निकालातील त्रुटी, परीक्षा रद्द होणे अशा घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला. नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारामुळे काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचा उल्लेख करत सरकारने अद्याप ठोस कारवाई न केल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनाचे नेतृत्व 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके यांनी केले. विशेष म्हणजे, ते शनिवारी सकाळी अमेरिकेतून दिल्लीत दाखल होताच थेट आंदोलनस्थळी पोहोचले. दिल्ली विमानतळावरून बाहेर पडताना त्यांच्या हातात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तक असल्याचे दृश्य उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. सुरुवातीला या आंदोलनाला दिल्ली पोलिसांची परवानगी मिळणार की नाही, याबाबत संभ्रम होता. मात्र अखेर पोलिसांनी अधिकृत परवानगी दिल्यानंतर आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला. देशभरातील विद्यार्थी, पालक, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार तसेच कोचिंग संस्थांशी संबंधित नागरिक मोठ्या संख्येने जंतर-मंतर येथे जमले. शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या मांडाव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे संरक्षण करणे या प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजधानीत सुरक्षा व्यवस्था अभूतपूर्व पातळीवर वाढविण्यात आली होती. नवी दिल्ली जिल्ह्याची १२ झोनमध्ये विभागणी करण्यात आली असून संसद मार्ग, जंतर-मंतर आणि इतर संवेदनशील भागांमध्ये दोन हजारांहून अधिक पोलीस व निमलष्करी दलाचे जवान तैनात करण्यात आले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या निवासस्थानांबाहेरही कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली. जंतर-मंतरकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर बॅरिकेडिंग करण्यात आले असून वाहनांची कसून तपासणी केल्यानंतरच प्रवेश दिला जात होता. दिल्ली पोलिसांकडून मिळालेली अधिकृत परवानगी आणि देशभरातून मिळालेला प्रतिसाद यामुळे 'कॉकरोच जनता पार्टी'साठी हे पहिले मोठे संघटनात्मक यश मानले जात आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर उभे राहिलेले हे आंदोलन आता राष्ट्रीय चर्चेचा विषय बनले असून, केंद्र सरकारची पुढील भूमिका काय असणार याकडे लक्ष लागले आहे.

# 'कॉकरोच जनता पार्टी' : एका सोशल मीडिया पोस्टपासून देशव्यापी युवा चळवळीपर्यंतचा प्रवास

भारत हा जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक मानला जातो. दरवर्षी लाखो विद्यार्थी पदवीधर होतात, लाखो युवक विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करतात आणि त्याच वेळी लाखो तरुण रोजगाराच्या शोधात देशभर फिरताना दिसतात. गेल्या काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता, सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे संवादाची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. आज एका मोबाईल फोनवरून केलेली पोस्ट काही तासांत लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकते आणि राष्ट्रीय चर्चेचा विषय बनू शकते. मे २०२६ मध्ये घडलेली कॉकरोच जनता पार्टी ही घटना त्याचेच एक विलक्षण उदाहरण म्हणून पाहिली जात आहे.

विशेष म्हणजे ही कथा कोणत्याही पारंपरिक राजकीय पक्षाच्या स्थापनेची नाही, तर एका सोशल मीडिया पोस्टपासून सुरू झालेल्या डिजिटल चळवळीची आहे. सुरुवातीला अनेकांनी ती इंटरनेटवरील विनोद किंवा मीम संस्कृतीचा भाग म्हणून पाहिली; परंतु काही दिवसांतच ती बेरोजगारी, शिक्षण व्यवस्था आणि युवकांच्या अपेक्षांशी जोडली गेली. त्यामुळे देशातील प्रमुख माध्यमांनीही या विषयाची दखल घेतली आणि कॉकरोच जनता पार्टी हा शब्द राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला.

या संपूर्ण घटनेकडे पाहताना एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात ठेवली पाहिजे की, हा लेख कोणत्याही राजकीय पक्षाच्या समर्थनासाठी किंवा विरोधासाठी नाही. उलट, सार्वजनिक क्षेत्रात घडलेल्या घटनांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन या चळवळीची पार्श्वभूमी, घटनाक्रम आणि सामाजिक परिणाम समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे.

**अभिजित दीपके कोण आहेत?**

या चळवळीमागे ज्यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आले ते म्हणजे अभिजित दीपके. महाराष्ट्राशी संबंधित असलेले अभिजित दीपके यांनी अमेरिकेतील Boston University येथे Public Relations विषयाचे शिक्षण घेतले. उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते इतर अनेक भारतीय विद्यार्थ्यांप्रमाणे अमेरिकेत नोकरीच्या शोधात होते. त्यांच्या स्वतःच्या मुलाखतींमध्ये त्यांनी सांगितल्याप्रमाणे, त्यांनी या उपक्रमाची सुरुवात कोणताही मोठा राजकीय कार्यक्रम म्हणून केली नव्हती. ती सुरुवात एका व्यंगात्मक प्रतिक्रियेतून झाली.

काही वर्षांपूर्वी त्यांनी आम आदमी पार्टीमध्ये स्वयंसेवक म्हणून काम केल्याची माहितीही विविध माध्यमांमध्ये समोर आली. मात्र कॉकरोच जनता पार्टी ही कोणत्याही विद्यमान राजकीय पक्षाची शाखा नसून स्वतंत्र सामाजिक उपक्रम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, युवकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठाची गरज आहे आणि त्यातूनच ही कल्पना पुढे आली.

**या चळवळीची ठिणगी कशी पडली?**

मे २०२६ च्या मध्यात सार्वजनिक चर्चेमध्ये सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान झालेल्या निरीक्षणाबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली. त्या चर्चेमध्ये कॉकरोच हा शब्द सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर वापरला जाऊ लागला. त्या वक्तव्याचा अर्थ, संदर्भ आणि त्याबाबतची स्पष्टीकरणे यावर विविध स्तरांवर चर्चा झाली. पुढे संबंधित न्यायमूर्तींनी युवकांचा अपमान करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे स्पष्ट केल्याची माहितीही माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाली. परंतु तोपर्यंत सोशल मीडियावर या विषयाने वेग घेतला होता.

याच पार्श्वभूमीवर १६ मे २०२६ रोजी अभिजित दीपके यांनी द (पूर्वीचे ट्विटर) या प्लॅटफॉर्मवर एक छोटासा प्रश्न लिहिला-

What if all cockroaches came together?

हा प्रश्न काही शब्दांचा होता; परंतु त्यामागील भावनेने हजारो युवकांना स्पर्श केला. काही तासांतच हजारो प्रतिक्रिया आल्या. अनेकांनी आम्हालाही आमचे प्रश्न मांडायचे आहेत, आमच्या संघर्षाला आवाज मिळायला हवा, आम्ही फक्त आकडे नाही अशा भावना व्यक्त केल्या. इंटरनेटच्या भाषेत सांगायचे तर हा पोस्ट काही तासांतच व्हायरल झाला.

**फक्त दोन तासांत वेबसाइट**

या पोस्टला मिळालेला प्रतिसाद पाहून अभिजित दीपके आणि त्यांच्या काही मित्रांनी एक वेगळा प्रयोग करण्याचे ठरवले. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) साधने आणि तांत्रिक मदतीचा वापर करून काही तासांतच The Cockroach Janta Party नावाची वेबसाइट तयार करण्यात आली. नंतर ही वेबसाइट या संपूर्ण चळवळीचे डिजिटल केंद्र बनली.

वेबसाइटवरील भाषाशैली पारंपरिक राजकीय घोषणांपेक्षा वेगळी होती. त्यामध्ये व्यंग, विनोद आणि थेट प्रश्न विचारण्याची शैली दिसून येते. आम्ही इथे मोठमोठी आश्वासने देण्यासाठी नाही, तर प्रश्न विचारण्यासाठी आलो आहोत, असा आशय अनेक ठिकाणी दिसतो. विशेष म्हणजे या वेबसाइटवर सदस्य नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

**काही दिवसांतच लाखो लोकांचे लक्ष**

सुरुवातीला अनेकांनी या उपक्रमाला इंटरनेटवरील तात्पुरता ट्रेंड समजले. परंतु पुढील तीन-चार दिवसांत परिस्थिती बदलू लागली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या चळवळीचे पोस्टर्स, मीम्स, व्हिडिओ आणि चर्चांचा पूर आला. हजारो युवकांनी स्वतःचे अनुभव लिहिण्यास सुरुवात केली. काहींनी सरकारी भरती प्रक्रियेतील विलंबाबद्दल लिहिले, काहींनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीत गेलेली वर्षे सांगितली, तर काहींनी शिक्षण पूर्ण करूनही नोकरी न मिळाल्याची खंत व्यक्त केली.

यामुळे कॉकरोच जनता पार्टी ही केवळ एका शब्दाभोवती फिरणारी चर्चा न राहता युवकांच्या भावना व्यक्त करणारे व्यासपीठ म्हणून पाहिली जाऊ लागली.

घटनाक्रम : दिवसागणिक वाढत गेलेली चर्चा

१५ मे २०२६ च्या सुमारास सार्वजनिक चर्चेमध्ये संबंधित न्यायालयीन निरीक्षणाचा विषय समोर आला आणि सोशल मीडियावर त्यावर प्रतिक्रिया उमटू लागल्या.

१६ मे २०२६ रोजी अभिजित दीपके यांनी द वर What if all cockroaches came together? हा पोस्ट केला. काही तासांतच त्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला.

१७ मे २०२६ रोजी वेबसाइटची उभारणी करण्यात आली. AI च्या मदतीने तयार झालेली ही वेबसाइट सोशल मीडिया चर्चेचे केंद्र बनली.

१८ ते २० मे दरम्यान हजारो युवकांनी स्वतःचे अनुभव या मोहिमेशी जोडले. अनेकांनी रोजगार, शिक्षण व्यवस्था आणि स्पर्धा परीक्षांवरील प्रश्न उपस्थित केले.

२० ते २५ मे या काळात राष्ट्रीय वृत्तसंस्था आणि डिजिटल माध्यमांनी या विषयाची दखल घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे ही चर्चा सोशल मीडियातून मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये पोहोचली.

मे महिन्याच्या अखेरीस सदस्य नोंदणी, ऑनलाइन याचिका आणि विविध सार्वजनिक आवाहने सुरू झाली. याच काळात या मोहिमेच्या सोशल मीडिया फॉलोअर्समध्ये मोठी वाढ झाल्याचे सांगितले गेले.




**युवकांनी इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद का दिला?**

हा प्रश्न सर्वात महत्त्वाचा आहे. कारण कोणतीही कल्पना केवळ नावामुळे लोकप्रिय होत नाही. तिच्यामागे समाजातील काही भावना कार्यरत असतात. अनेक युवकांच्या प्रतिक्रिया वाचल्या असता एक समान धागा दिसून येतो-अनिश्चितता. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे काय? स्पर्धा परीक्षांचा निकाल कधी लागेल? भरती प्रक्रिया कधी पूर्ण होईल? कौशल्य असूनही संधी का मिळत नाहीत? अशा प्रश्नांची उत्तरे शोधणाऱ्या अनेक युवकांना या मोहिमेमध्ये स्वतःचा आवाज ऐकू आल्याची भावना निर्माण झाली.

विशेष म्हणजे या चळवळीने स्वतःला पारंपरिक राजकीय भाषेपेक्षा वेगळ्या शैलीत मांडले. घोषणांपेक्षा प्रश्न विचारण्याची पद्धत, व्यंगाचा वापर आणि इंटरनेट संस्कृतीशी सुसंगत संवाद यामुळे तरुण वर्गाने ती सहज स्वीकारली.

**माध्यमांची दखल**

काही दिवसांतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांनी या चळवळीची दखल घेतली. अनेक वृत्तसंस्थांनी एका सोशल मीडिया पोस्टपासून सुरू झालेली डिजिटल चळवळ या स्वरूपात तिचे वर्णन केले. काही विश्लेषकांनी तिला ऋशप-न च्या असंतोषाचे प्रतीक म्हटले, तर काहींनी ती सोशल मीडिया युगातील नवीन प्रकारची सार्वजनिक अभिव्यक्ती असल्याचे मत व्यक्त केले.

याच काळात कॉकरोच जनता पार्टीच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यांबाबतही चर्चा सुरू झाली. काही खाते अवरोधित झाल्याच्या बातम्या समोर आल्या, त्यानंतर उेलज्ञीरलह ळी इरलज्ञ या नावाने नवीन हँडल सुरू करण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. त्यामुळे या चळवळीबाबतची उत्सुकता आणखी वाढली.

मात्र या सर्व घडामोडींमध्ये एक गोष्ट सातत्याने दिसून आली-ही चळवळ स्वतःला युवकांच्या प्रश्नांशी जोडण्याचा प्रयत्न करत होती. रोजगार, शिक्षण, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या विषयांभोवती तिचा सार्वजनिक संवाद केंद्रित राहिला.

कॉकरोच जनता पार्टीचे भवितव्य काहीही असो, तिने एक महत्त्वाचा प्रश्न देशासमोर उभा केला आहे- भारताचा युवक केवळ नोकरीची वाट पाहणारा नागरिक आहे की सार्वजनिक धोरणांवर मत व्यक्त करू इच्छिणारा सक्रिय सहभागी? या प्रश्नाचे उत्तर भविष्यातील सामाजिक आणि राजकीय घडामोडींमध्ये दडलेले आहे.

आजच्या डिजिटल युगात इंटरनेटवरील एक पोस्ट राष्ट्रीय चर्चेचा विषय बनू शकते. परंतु त्या चर्चेचे दीर्घकालीन मूल्य तिच्यामागील मुद्द्यांवर आणि समाजाने त्यातून काय शिकले यावर ठरते. कॉकरोच जनता पार्टीची कथा म्हणूनच एका शब्दाची कथा नाही; ती बदलत्या भारताची, बदलत्या संवादपद्धतीची आणि स्वतःचा आवाज शोधणाऱ्या युवकांच्या पिढीची कथा आहे.

या संपूर्ण घटनेकडे संतुलित दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. एका बाजूला सोशल मीडियाच्या माध्यमातून युवकांनी स्वतःचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला, तर दुसऱ्या बाजूला या चळवळीच्या दीर्घकालीन परिणामांबाबत प्रश्न उपस्थित झाले. लोकशाहीमध्ये दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत- अभिव्यक्तीचा अधिकार आणि तथ्याधारित सार्वजनिक चर्चा.

शेवटी, कॉकरोच जनता पार्टी योग्य की अयोग्य, याचा निर्णय इतिहास करेल. मात्र तिने रोजगार, शिक्षण, पारदर्शकता आणि युवकांच्या अपेक्षा या विषयांवर देशव्यापी चर्चा निर्माण केली, हे निश्चित आहे. आणि कदाचित हाच या संपूर्ण घटनेचा सर्वात महत्त्वाचा परिणाम मानला जाईल.

संगमनेरकरांनी गौरविलेले
||जय श्रीराम||
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# फडणवीस-विखेंचे जरांगे यांनी मानले आभार
## मराठा प्रश्नांवर सकारात्मक निर्णय



युवावार्ता (प्रतिनिधी) लोणी - मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करत मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार प्रसाद लाड यांचे मनापासून आभार मानले आहेत.

जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाच्या विविध मागण्यांची अंमलबजावणी करून समाजाला न्याय देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांनी यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याचे त्यांनी नमूद केले. ओबीसी समाजाप्रमाणेच मराठा समाजालाही विविध शासकीय सवलती, सारथी संस्थेअंतर्गत योजना तसेच महामंडळाच्या काही बंद पडलेल्या योजना आणि अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

आंदोलनादरम्यान बलिदान गेलेल्या कुटुंबांच्या प्रश्नालाही सरकारने गांभीर्याने हाताळल्याचे सांगत, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष पुढाकार घेतल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले. मराठा समाजाच्या मागण्यांना प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत नेण्यासाठी सरकारच्या वतीने विखे पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस, विखे पाटील, प्रसाद लाड आणि संपूर्ण सरकारचे मी मनापासून आभार मानतो, असेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

# ग्लोबल वॉर्मिंग रोखण्यासाठी प्रत्येकाने दोन झाडे लावावीत - बाळासाहेब थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर-वॉर्मिंगच्या समस्येमुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे, वाढलेली उष्णता, कमी झालेला पाऊस, दुष्काळ, पर्यावरणाचा असमतोल हा सजीव सृष्टीसाठी धोकादायक असून हे टाळण्यासाठी पर्यावरण संवर्धन हे अत्यंत गरजेचे आहे. याकरता येणाऱ्या पावसाळ्यात प्रत्येकाने किमान दोन झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे आंतरराष्ट्रीय जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दंडकारण्य अभियान आढावा घेण्यात आला. याप्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक मा. आ.डॉ सुधीर तांबे, पांडुरंग पाटील घुले, सौ.दुर्गाताई तांबे, संपतराव डोंगरे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, रामहरी कातोरे, सुनील कडलग, रावसाहेब दुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, समन्वयक दशरथ वर्पे, डॉ सुजित खिलारी, अनिल थोरात, सेक्रेटरी किरण कानवडे, प्रा व्ही बी.धुमाळ, कृष्णा दिघे, बाळासाहेब फापाळे, वन विभागाच्या अधिकारी श्रीमती हिरे, संतोष पारधी, परते यांच्यासह विविध विभाग प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, जगापुढे ग्लोबल वार्मिंगची मोठी समस्या निर्माण झाली आहे. वाढती उष्णता कमी झालेला पाऊस हे अत्यंत चिंतेचे आहे. यावर्षी देशांमध्ये कमी पाऊस सांगितला आहे. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास यामुळे या समस्या होत असून यापुढील काळात प्रत्येकाने पर्यावरण संवर्धन केलेच पाहिजे.

दंडकारण्य अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण व वृक्ष संवर्धन संस्कृती तालुक्यात वाढली असून सहकारातील विविध संस्थांनी तालुक्यातील डोंगरांवर वृक्षारोपण करून संवर्धन केले आहे. यावर्षीही प्रत्येक नागरिकांनी जास्तीत जास्त वृक्षारोपण करून ते जपावे असे आवाहन त्यांनी केले.

# मारहाण प्रकरणातील आरोपींना अटक करा
## ग्रामस्थांचा प्रशासकीय भवनावर मोर्चा

संगमनेर, प्रतिनिधी :
तालुक्यातील कासारा-दुमाला येथील रहिवासी स्वप्नील रोहिदास सातपुते यांना झालेल्या कथित मारहाणीच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि. ५) ग्रामस्थांनी संगमनेर येथील यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकीय भवनावर मोर्चा काढून तीव्र संताप व्यक्त केला. ३० मे रोजी घडलेल्या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने नागरिकांनी पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला.

मिळालेल्या माहितीनुसार, स्वप्नील सातपुते व त्यांचे सासरे त्र्यंबक लक्ष्मण राऊत हे नादुरुस्त वाहन दुरुस्तीसाठी मालपाणी बजाज शोरूममध्ये गेले होते. वाहनाची जबाबदारी स्वीकारून त्याबाबत पावती देण्याच्या मुद्द्यावर चर्चा सुरू असताना शोरूम व्यवस्थापक सचिन पलोड आणि अन्य कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी बाचाबाची झाली. त्यानंतर इतर काही जणांनी सातपुते व राऊत यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेनंतर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असला तरी आरोपींना अद्याप अटक न झाल्याने कासारा-दुमाला व परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. याच पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी एकत्र येत प्रशासकीय भवनावर मोर्चेने धडकले. मोर्चादरम्यान हाताला काळ्या फिती बांधून शोरूम व्यवस्थापन व पोलिसांच्या संथ कारभाराचा निषेध नोंदविला. आरोपींना तात्काळ अटक करा, पीडितांना न्याय द्या अशा घोषणांनी संपूर्ण प्रशासकीय भवन परिसर दणाणून गेला होता.


# दंडकारण्य अभियान अंतर्गत नान्नज विद्यालयात पर्यावरण दिनी वृक्षारोपण



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या संत तुकाराम महाराजांच्या विचाराला अनुसरून ५ जून-जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपणाचा उपक्रम नान्नज दुमाला येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयात स्थानिक स्कूल कमिटी व माजी विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात राबविण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व भावी पिढ्यांना निरोगी आणि हरित भविष्य देण्यासाठी वृक्षारोपण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामानातील बदल यांमुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. असे विचार मुख्याध्यापक एच आर सोनवणे यांनी व्यक्त केले .या पार्श्वभूमीवर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून माजी विद्यार्थी व उपक्रमशील शिक्षक रामेश्वर चत्तर तसेच गणेश गायकवाड आणि संगमनेर येथील शिवदास मणियार पेट्रोल पंपाचे मॅनेजर विकास गायकवाड यांचे हस्ते विद्यालयात पर्यावरणपूरक देशी व उपयुक्त महोगनी रोपांचे रोपण करण्यात आले.

झाडे लावा, झाडे जगवा ,निसर्ग वाचवा हा संदेश देत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन मुख्याध्यापक सोनवणे यांनी केले. या उपक्रमात विद्यालयातील बाळासाहेब कुळधरण , बबन दळवी, बाबासाहेब गर्दे ,संजय सोनवणे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी , माजी विद्यार्थी, तसेच इयत्ता सातवी, आठवी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांनी कृतिशील सहभाग घेतला. महोगनी या देशी रोपांच्या रोपणामुळे शालेय परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे अशी भावना माजी विद्यार्थी रामेश्वर चत्तर यांनी व्यक्त केली. दत्तक झाड योजने अंतर्गत यावेळी झाडांच्या संवर्धनासाठी दोन विद्यार्थ्यांना एक झाड दत्तक देण्यात आले.पर्यावरण दिनानिमित्त १५ महोगनी रोपांची भेट सहशिक्षक पिंगळे बी .आर. यांनी विद्यालयास दिली.

# वाचाल तर तगाल !
## व्हॉट्सॲपच्या 'स्क्रोलिंग'मध्ये हरवलेली वाचन संस्कृती



आदरणीय घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी वाचेल तो वाचेल ! असे वाचनाविषयी म्हटल होत. जूनी शिक्षित पिढी बऱ्यापैकी वाचत असे. अगदी ग्रंथ नाही वाचले तरी शेजाऱ्याकडून उसना आणून का होईना किमान वर्तमानपत्र वाचत असत.

वयानुसार वाचनाच्या आवडीही बदलत असत. लहानपणी कुमार , किशोर, चांदोबा, चंपक इ. खास लहान मुलांसाठीची मासिकं आवडीने वाचली जात. वय वाढेल तस मग कॉमिक बुक्स उदा. वेताळ, सुपरमॅन, मॅन्ड्रेक इ. कडे कल वळत असे. थोड आणखीन वय वाढल की मग स्वामी, मृत्युंजय, श्रीमानयोगी, राऊ इ. ऐतिहासिक कादंबऱ्या वाचल्या जात. मग पुढच्या वयात सर्वच साहित्यिक व साहित्य प्रकार आवडायला लागत. बाबुराव अर्नाळकर, सुहास शिरवळकर, गुरुनाथ नाईक इ. च्या रहस्यकथा आणि नारायण धारप, रत्नाकर मतकरी इ सारखे भयकथा लेखक पण प्रिय होऊन जात. नंतर जयवंत दळवी, विश्वास पाटील, रंगनाथ पठारे, व. पु. काळे, पु. ल. देशपांडे, ना. स. इनामदार, अनिल अवचट, मेघना पेठे इ. अनेक साहित्यिक वाचले जात. गावातल्या व्याख्यानमालांना मुले व तरुण गर्दी करत.

हा गतकाळ अलिकडे मात्र झपाट्याने बदलत गेला. विशेषतः मोबाईल नावाची वस्तू तरुणाई आणि अगदी बालकांच्याही हातात आली आणि सगळच बदलून गेलं. चांदोबा, चंपक इ जवळपास बंदच पडले. वर्तमानपत्र वाचकही रोडावले. पूर्वी वाचनालयात पुस्तक घेण्यासाठी नंबर लागत. आता फारशी गर्दी नसते.

नवीन पिढीला हातात पुस्तक घेऊन वाचणे कंटाळवाणे वाटत असेलही म्हणून किंडल सारखं वाचन साधन निर्माण झाल. किंडलवर बरीच छान छान पुस्तक उपलब्ध असतात. पण त्याचा वापर किती होतो ते माहित नाही. जरी नवी पिढी वाचनासाठी नवनवीन माध्यमांचा वापर करत आहे तरी ज्याला दर्जेदार किंवा अभिजात साहित्य म्हणतात त्यापासून दुरावत चाललीय. मोठमोठ्या कादंबऱ्या वाचण्याचा पेशन्स उरलेला नाही. झटपट एखादे पान वाटस अप वर घाईघाईत वाचणं म्हणजे वाचन नाही. ययाती, ताम्रपट, श्रीमानयोगी, मृत्युंजय, पर्व इ. सारख्या महाकादंबऱ्या कितपत वाचल्या जातात हा प्रश्नच आहे. अर्थात वाचन कमी होण्यासाठी इतरही कारण आहेत. पालक मुलांना नको त्या वयात मोबाईल हातात देतात. घरातच पुस्तक विकत आणली जात नाहीत. वाचनालयात तिथे बसून वाचता येईल अशा सुविधा उपलब्ध नाहीत. जगण्यातली वाढती स्पर्धा व यामुळेच स्पर्धा किंवा अन्य परीक्षांच्या अभ्यासात अवांतर वाचनाला वेळच राहात नाही. मुल ही अनुकरणातून अनेक गोष्टी शिकतात. पालक जर टीव्हीवर मालिका पाहण्यात दंग असतील, कधी पुस्तक वाचणारे पालकच मुलांना दिसत नसतील तर मुल वाचणार कशी. आईवडील दोघेही नोकरीत असतील आणि घरात आजीआजोबा नसतील तर वाचन संस्कार होणार कसे ? वर्गात शिक्षकही मुलांना अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करत नाहीत, स्वतः वाचलेल्या चांगल्या पुस्तकाविषयी बोलत नाहीत. अशी अनेक कारण वाचन संस्कृती कमी व्हायला कारणीभूत आहेत.

पण ही वाचन संस्कृती पुनरुज्जीवीत होण गरजेच आहे. यासाठी पालक, शिक्षक, ग्रंथपाल, लेखक, व्याख्याते आणि समाजातील सुजाण मंडळी यांनी एकत्रीतपणे जाणीवपूर्वक काही उपक्रम हाती घेतले पाहिजेत. मध्यंतरी एका गावाने संध्याकाळी किमान एक तास टीव्ही बंद व अभ्यास असा उपक्रम केला. असाच उपक्रम वाचनासाठी होणे गरजेचे आहे. वाचन हा अभ्यासक्रमाचा एक भाग झाला पाहिजे. पालकांनीही किमान काही दर्जेदार पुस्तक विकत घेऊन ती घरात ठेवली पाहिजेत व ती मुलांनी वाचावीत यासाठीच प्रोत्साहन दिलं पाहिजे. मुलाना लहानपणी काही वाचून दाखवल पाहिजे. शाळेतही शिक्षकांनी वाचन विषयक उपक्रम घेतले पाहिजेत. महाविद्यालयातही असे वाचन प्रोत्साहनपर उपक्रम वर्षभर व्हावेत. केवळ पुस्तक दिन वर्षातून एकदा घेऊन जबाबदारी संपत नाही, तर त्यात प्रयत्नांचे सातत्य हवे. महाबळेश्वर जवळ भिलारवाडी ग्रामस्थांनी पुस्तकाच गाव म्हणून ओळख निर्माण केली. याच खूप कौतुक झाल पण नंतर त्याच अनुकरण मात्र झाल नाही.

एका बाजूला अशी वाचन स्थिती असताना साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शने इ. ना मात्र अलोट प्रतिसाद मिळून प्रचंड ग्रंथ विक्री होते असेही चित्र आहे. ही विकत घेतलेली पुस्तक कदाचित दिवाणखाने सजवत असतीलही पण वाचन संस्कृती मात्र लोप होत चाललीय हे वास्तव नाकारण्या सारख नाही.

**प्रा. डॉ. अनंत दिवेकर, संगमनेर**

# 'Excellence in Leadership' पुरस्काराने थायलंडमध्ये चैतन्य गिरी यांचा गौरव




थायलंडमधील फुकेत येथे "Excellence in Leadership' पुरस्कार स्वीकारताना चैतन्य श्रीकांत गिरी

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - थायलंडमधील फुकेत येथे नुकत्याच संपन्न झालेल्या Asia Leadership Summit मध्ये संगमनेरचे सुपुत्र चैतन्य श्रीकांत गिरी यांना प्रतिष्ठेचा Excellence in Leadership पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. आशिया खंडातील विविध देशांतील उद्योग, शिक्षण, व्यवस्थापन आणि नेतृत्व क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला.

नेतृत्व कौशल्य, व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, प्रभावी कार्यपद्धती आणि संस्थात्मक विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेत चैतन्य गिरी यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला जागतिक पातळीवर मान्यता मिळाल्याचे अधोरेखित झाले आहे. चैतन्य गिरी हे श्रीकांत बापूगिरी यांचे चिरंजीव असून त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर नेतृत्व क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशामुळे संगमनेरसह संपूर्ण परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या गौरवाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने देखील त्यांचे अभिनंदन आणि शुभेच्छा.

# संपादकीय...

## अशोक सराफ : मराठी चित्रपटातील सर्वश्रेष्ठ अभिनेता... वाढदिवस विशेष

अशोक सराफ हे एक भारतीय विनोदी अभिनेता आहेत, जे मराठी आणि हिंदी चित्रपटांसह दोन्ही भाषांमधील थिएटरमध्ये काम करण्यासाठी ओळखले जातात. सराफ यांना चार फिल्मफेअर पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील महानायक- सर्वश्रेष्ठ अभिनेता, अशोक सम्राट किंवा मामा असे संबोधले जाते. सन २०२३मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान मिळाला. अशोक सराफ यांनी विविध मराठी नाटके आणि हिंदी मालिकांमध्येही काम केले आहे. त्यानंतर त्यांनी अनिकेत टेलिफिल्म्स हे स्वतःचे प्रोडक्शन हाऊस विकसित केले, जे त्यांची पत्नी निवेदिता जोशी- सराफ हाताळते.

अशोक सराफ हे एक भारतीय विनोदी अभिनेता आहेत, जे मराठी आणि हिंदी चित्रपटांसह दोन्ही भाषांमधील थिएटरमध्ये काम करण्यासाठी ओळखले जातात. सराफ यांना चार फिल्मफेअर मराठी पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील महानायक- सर्वश्रेष्ठ अभिनेता, अशोक सम्राट किंवा मामा असे संबोधले जाते. सन २०२३मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान मिळाला. सन १९८०च्या दशकाच्या सुरुवातीपासून सराफांना मराठी चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका मिळू लागल्या. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर आणि महेश कोठारे यांच्या संयोजनाने १९८५पासून मराठी चित्रपटसृष्टीत कॉमेडी चित्रपटांची लाट निर्माण केली जी एक दशकाहून अधिक काळ टिकली. एक डाव भुताचा-१९८२, धुम धडाका-१९८५, गम्मत जम्मत-१९८७, भुताचा भाऊ-१९८९, बाळाचे बाप ब्रह्मचारी-१९८९, अशी ही बनवा बनवी-१९८८ आणि हे प्रमुख नायक म्हणून त्यांच्या यशस्वी मराठी चित्रपटांमध्ये आहेत. आयत्या घरात घरोबा-१९९१. बॉलीवूडमध्ये त्यांनी करण अर्जुन-१९९५, येस बॉस-१९९७, जोरू का गुलाम-२०००, सिंघम-२०११ इत्यादी आणि डोंट वरी हो जायेगा यासह दोन हिंदी टेलिव्हिजन सिटकॉममध्ये काम केले.

अशोक सराफ यांचा जन्म मुंबई येथे दि.४ जून १९४७ रोजी झाला. ते दक्षिण मुंबईच्या चिखलवाडी परिसरात लहानाचे मोठे झाले आणि शिक्षणासाठी डीजीटी विद्यालयात गेले. ज्येष्ठ अभिनेते अशोक कुमार यांच्या नावावरून त्यांचे नाव अशोक ठेवण्यात आले. त्यांचे बालपण दक्षिण मुंबईतील चिखलवाडी येथे गेले. त्यांचे शालेय शिक्षण डीजीटी विद्यालय मुंबई येथे पूर्ण झाले. सन १९९०मध्ये त्यांचा विवाह अभिनेत्री निवेदिता जोशी यांच्याशी झाला. त्यांनी गोव्यातील मंगुशी मंदिरात लग्न केले, जेथे सराफचे कुटुंब मूळचे आहे. त्यांना अनिकेत सराफ नावाचा मुलगा आहे जो एक आचारी आहे. अशोक सराफ सन १९६९पासून चित्रपट आणि दूरचित्रवाणी उद्योगात कार्यरत आहेत. त्यांनी २५०हून अधिक मराठी चित्रपटांमध्ये काम केले आहे, त्यापैकी १००हून अधिक व्यावसायिकरित्या यशस्वी ठरले आहेत. त्यांनी मुख्यतः कॉमेडी चित्रपटांमध्ये काम केले आहे. सन १९६९मध्ये जानकी या मराठी चित्रपटातून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी दोनी घरचा पाहुणा, जवळ ये लावू नको, तुमचा आमचा जमला, चिमणराव गुंड्याभाऊ, डीड शहाणे, हळदी कुंकू, दुनिया करी सलाम आणि इतर चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. सन १९७० आणि १९८०चे दशकात लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन आणि महेश कोठारे यांच्यासोबत त्यांनी मराठी चित्रपटांमध्ये काम करत राहिले. अशी ही बनवा बनवी, आयत्या घरात घरोबा, बाळाचे बाप ब्रह्मचारी, भुताचा भाऊ आणि धुम धडाका हे काही उल्लेखनीय मराठी चित्रपट आहेत ज्यात त्यांनी अभिनय केला आहे. अशोक सराफ यांनी विविध मराठी नाटके आणि हिंदी मालिकांमध्येही काम केले आहे. त्यानंतर त्यांनी अनिकेत टेलिफिल्म्स हे स्वतःचे प्रोडक्शन हाऊस विकसित केले, जे त्यांची पत्नी निवेदिता जोशी- सराफ हाताळते. त्यांनी १९८०मध्ये अभिनेता लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत अशी ही बनवा बनवी, बाळाचे बाप ब्रह्मचारी असे अनेक हिट कॉमेडी जॉनर चित्रपट केले. मराठी चित्रपटसृष्टीतील आणखी एक विनोदी अभिनेता लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबतची जोडी यशस्वी झाली, ज्यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्येही भूमिका केल्या आहेत. सराफ यांच्यासोबत बेर्डे आणि सचिन पिळगावकर यांनी अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम केले. त्यांनी अशी ही बनवा बनवी मध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील दोन सुपरस्टार सचिन पिळगावकर आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या प्रमुख भूमिकेत मोठ्या यशाची चव चाखली.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
1) KHAN SHAHISTAKHANAM MD RAFIQ
2) KHAN SHAHISTA RAFIC

NEW NAME AS
SHAHISTA RAFIQ KHAN

ADD -NEAR P W D, NAIKWADPURA.
TAL - SANGAMNER,
DIST,- AHILYANAGAR,422605



**पाहिजेत**

सार्थक ॲग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता
टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २
नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर
९५५२५०६३६३


# वसुंधरेचे संरक्षण आणि संवर्धन ही प्रत्येकाचीच नैतिक जबाबदारी - प्रा. खरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जंगले संपली तर जलसंपेल, जलसंपले तर शेती संपेल, शेती संपली तर माणूस संपेल, यासाठी वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन महत्त्वाचे आहे. थोडक्यात वसुंधरेचे संरक्षण आणि संवर्धन ही प्रत्येकाचीच नैतिक जबाबदारी आहे असे विचार दंडकारण्य अभियानाचे प्रचारक प्राध्यापक बाबा खरात यांनी ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विचार व्यक्त केले.



यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले कि, थोर स्वातंत्र्य सेनानी स्व. भाऊसाहेब थोरात यांनी ६ जून २००६ रोजी दंडकारण्य चळवळीचा शुभारंभ केला. आज दंडकारण्य चळवळीने जन आंदोलनाचे स्वरूप धारण केले आहे. त्याचा परिणाम पर्यावरण संरक्षण व पर्यावरण संवर्धनास होत आहे. निसर्गाला जपले नाही तर निसर्ग आपल्याला संपवेल. वने जगली तर पशु पक्षी आणि प्राणी जगतील. जैविक साखळी अबाधित राहिली तर मनुष्य जगेल. मानव हाच पर्यावरणाचा एक कुशल घटक आहे. मात्र पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप वाढत चाललेला आहे. यासाठी आपले एकच ध्येय आहे. ते म्हणजे झाडे लावा - झाडे जगवा. साने गुरुजी म्हणतात, वृक्ष म्हणजे परमेश्वराचे हिरवे हात आहेत.

ज्या गावांना हे हिरवे हात कवटळतात त्या गावांना ते आशीर्वाद देतात. सुखशांती व चिरंतन कल्याणाचा वर देतात. आपल्या भावी पिढ्यांच्या उज्वल भविष्यासाठी हे हिरवे हाते न तोडता त्यांचे संगोपन केले पाहिजे. जागतिक तापमानात वाढ होत आहे. ऋतुमानात बदल होत आहे. राज्यातील वनक्षेत्रे २०% वरून ३३% पर्यंत नेणे आवश्यक आहे. वाढते प्रदूषण ही एक समस्या आहे. पृथ्वीवरील प्रदूषण कमी करावयाचे असेल तर वनसंवर्धन झालेच पाहिजे. वने असतील तर शुद्ध हवा मिळेल. जमिनीतील पाण्याचा स्रोत वाढेल. पशुपक्षी प्राणी यांची संख्या वाढून जैविक समतोल राखला जाईल. निसर्गाचे देणे फेडण्यासाठी नव्या झाडांची लागवड केली पाहिजे. नैसर्गिक संपत्तीचा जपून वापर करण्याची शपथ सर्वांनी घेतली पाहिजे.

५ जून पर्यावरण दिन साजरा करताना सर्वांनी मिळून वृक्षलागवड व वृक्षसंकल्प हाती घेऊन सिद्धीस नेऊया असे आवाहनही यावेळी प्रा. बाबा खरात यांनी केले आहे.

# ज्ञानवर्धिनीच्या शालेय सुविधांसाठी संस्था आर्थिक सहाय्य करेल - सुमतीलाल कोठारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - ज्ञानवर्धिनी शाळेचा दर्जा, गुणवत्ता व पालकांचा विश्वास यासाठी हिंद सेवा मंडळ नेहमी खंबीरपणे साथ देत अर्थिक सहकार्य करेल . सर्वसामान्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण आणि गुणवत्तेसाठी संस्था काहीही कमी पडू देणार नाही असा विश्वास हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी व्यक्त केला.

ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर येथे नव्याने बसविण्यात आलेल्या पेवर ब्लॉक कामाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. डॉ. सी. पी. देशपांडे यांच्या स्मरणार्थ हा उपक्रम राबविण्यात आला असून यासाठी सन्माननीय डॉ. सुधाताई देशपांडे यांच्या अर्थिक सहकार्यातून पेवर ब्लॉक चे मोठे काम पूर्ण झाले .पेवर ब्लॉक कामाचे लोकार्पण हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी व कार्यकारिणी सदस्या प्रा. ज्योतीताई कुलकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आले

यावेळी शाळा व्यवस्थापनाच्या वतीने डॉ. सुधाताई देशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच हिंद सेवा मंडळाचे नवनिर्वाचित कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांचा अकोले विभागातर्फे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडर्न हायस्कूलचे चेअरमन मोरेश्वर धर्माधिकारी होते. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे संचालक दिलीपभाई शहा, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन तथा नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, प्राथमिक विभागाच्या चेअरमन स्मिता मुंदडा, बालकमंदिर चेअरमन रामेश्वर रासने, हिंद सेवा मंडळाचे सहाय्यक सचिव योगेश देशमुख, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर अमोल वैद्य, सेवा निवृत्त प्राचार्य संतोष कचरे, पर्यवेक्षक सुधीर जोशी ,विनायक दैवज्ञ, सुरेखाताई धर्माधिकारी , पुष्पाताई वाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना हिंद सेवा मंडळाच्या संचालिका प्रा. ज्योतीताई कुलकर्णी यांनी, सामाजीक भान व कर्तव्य भावनेने दान करत रहावे,शिक्षकांनी आपले कार्य मनापासून करावे हेच त्यांचे पुण्य आहे. शिक्षकाची आदर्श प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनात कायम राहते. आधुनिक शिक्षणतत्त्वांची जोड देत आदर्श समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. शालेय परिसरातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या या कामामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यासोबतच स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठा लाभ होणार असल्याचे सांगितले. शाळा भरतांना व सुटतांना पालकांना ऊन,पाऊस असतांना उभे रहावे लागत असायचे. त्यांच्यासाठी शाळेच्या प्रवेश द्वारा जवळ एक उत्तम शेड बनविण्यात आली आहे .तिचेही लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले

कार्यक्रमाचे प्रास्तविक व स्वागत मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांनी केले .अध्यक्षीय सूचना बाळासाहेब मांडे यांनी तर अनुमोदन सोनाली मालवणकर यांनी दिले .सूत्रसंचलन दत्ताभाऊ पोपेरे यांनी केले. योगेश नवले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संगमनेरातील ...

पान १ वरून - १११ लागू करण्यासाठी प्रस्ताव अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्याकडे पाठविला होता. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी आरोपींनी आर्थिक व भौतिक लाभ मिळविण्यासाठी संघटित टोळी स्थापन करून सातत्याने गंभीर स्वरूपाची गुन्हेगारी कृत्ये केल्याचे निदर्शनास आणत कलम १११ लागू करण्यास मंजुरी दिली. विशेष म्हणजे भारतीय न्याय संहिता २०२३ मध्ये संघटित गुन्हेगारी रोखण्यासाठी नव्याने समाविष्ट करण्यात आलेले कलम १११ हे मोक्का कायद्यातील तरतुदींप्रमाणेच कठोर स्वरूपाचे मानले जाते. दोन किंवा त्यापेक्षा अधिक गंभीर गुन्ह्यांमध्ये सामूहिक सहभाग असलेल्या आरोपींवर हे कलम लावले जाऊ शकते. या कलमांतर्गत दोषी आढळल्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ३६४/२०२६ मध्ये यापूर्वी भारतीय न्याय संहिता कलम ३१०(१), ३१०(२) व ३१०(६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये आता कलम १११ ची वाढ करण्यात आली आहे. संगमनेर शहरात व परिसरात संघटीत गुन्हेगारांच्या टोळ्या सक्रिय झाल्या असून चोऱ्या, दरोडे, हणामारी अशा घटनांमध्ये मोठा वाढ झाली आहे. या पार्श्वभुमीवर पोलीसांनी घेतलेली ही भुमिका निश्चितच कौतूकास्पद आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर, पोलीस उपनिरीक्षक सांवत व त्यांच्या पथकाने केली.

# मारहाण प्रकरणाला...

पान १ वरून -

या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५४३ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ७४, १८९(२), १९०, १९१(२), ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ व ३२४(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या सलीम शेख यांची प्रकृती उपचारादरम्यान खालावली. शुक्रवारी सायंकाळी त्यांना पुन्हा उपचार देण्यात आले मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. असा आरोप कुटूंबाने केला आहे. त्यामुळे या प्रकरणाचे स्वरूप अधिक गंभीर बनले आहे. सलीम शेख यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबीयांनी संबंधित आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. आरोपींना तत्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा मृतदेहावर अंत्यसंस्कार करणार नसल्याचा इशारा नातेवाईकांनी दिला आहे. या घटनेमुळे संगमनेर शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून शहर पोलिसांनी प्रकरणाचा तपास वेगाने सुरू केला आहे. मृत्यूचे नेमके कारण व मारहाणीशी त्याचा संबंध यांचा वैद्यकीय अहवाल आणि पुढील तपासानंतरच स्पष्टता येणार आहे. पोलीसांच्या म्हणण्यानुसार मयत सलीम याचा मृत्यू नेमका कसा झाला याचा तपास करून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

## राज्याभिषेक ..

शिव राज्याभिषेकार्थ
स्वताचं आतुरला क्षण
नोंदला असेलं पंचांगा
अद्भुत वेगळा हा सण

हिंदवी स्वराज्य जनले
इतिहासनोंदे आठवण
धांदलउडाली शब्दांची
प्रसंगा करता साठवण

कमी केले काही अंशी
आऊ तव कूसाचेऋण
एकाच सम्राटा एकवटे
कसे हो समस्तसद्गुण

हळूवार पुसलेअंमळसे
अन्याय अत्याचार व्रण
हलके झाले जय घोषा
पारतंत्र्यओझे मणमण

कुर्निसात करे शिवाला
रक्ताने चिंबले रणांगण
हुतात्माझालेले मावळे
ये अदृश्यरुपे मित्र गण

अर्थपूर्ण शिवमुद्रा करे
घेतल्या शपथा स्मरण
प्रसवकळास्वातंत्र्याची
उत्सवा या दुःख हरण

निसर्गे बांधले रायगडा
महामहोत्सवाचेतोरण
श्रीं इच्छा फल स्वरूप
राज्याभिषेकाचेकारण

हेमंत मुसरीफ, पुणे,
मोबा.९७३०३०६९९६


**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - 0२
ड्रायव्हर - 0१
सेल्समन - 0१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090



**भाड्याने देणे आहे**

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458



**पाहिजेत**

संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
9423793758



**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर
श्री गणेश टायर्स
या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758



**पाहिजेत**

मे. संदीप महाले ज्वेलर्ससाठी
दागिन्यांच्या बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत
- संपर्क-
मे. संदीप बबन महाले ज्वेलर्स
बाजारपेठ, संगमनेर, जि. अ.नगर
8698305864



**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846



**पाहिजेत**

होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410



**कामगार भरती**

अकाउंटंट - 0१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- 0५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- 0१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962



**जागा भाड्याने देणे**

३ मजली
८00 स्क्वेफूट
ठिकाण -
मोमीनपुरा चौक,फेमस शुज समोर, संगमनेर
9028342110



**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष)
ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला)
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६









# अंभोरे धरणातील पाणी सोडण्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न - भास्कर खेमनर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अंभोरे पिंपरणे परिसरातील शेतकरी व नागरिकांना उन्हाळ्यामध्ये पाणी मिळावे यासाठी महाराष्ट्राचे माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी मागील २५ वर्षापासून दरवर्षी उन्हाळ्यामध्ये अंभोरे धरणा मधून देव नदीमध्ये पाणी सोडले आहे. याला सर्व जनता साक्ष असून कोणीही पत्रक बाजी करून श्रेय घेऊ नये असे आवाहन माजी सरपंच भास्कर खेमनर व अंभोरे ग्रामस्थांनी केले आहे.

अंभोरे ग्रामस्थांनी म्हटले आहे की लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने अंभोरे गावाला दरवर्षी अंभोरे धरणातून पाणी दिले आहे. उन्हाळ्यामध्ये पिंपरणे व अंभोरे येथील ग्रामस्थांच्या मागणीवरून देव नदीमध्ये पाणी सोडण्यात येत होते. यासाठी स्वर्गीय सोपान बिरू खेमनर, स्वर्गीय सुंदर जगनर, कै. मंजाबापू खेमनर, त्यानंतर ज्येष्ठ कार्यकर्ते लहानु भिमाजी खेमनर, रामदास केरू खेमनर, यांनी कायम हे पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा केला. सोपान बिरू खेमनर यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी शिष्टमंडळ भेटायचे याबाबतची सर्व माहिति कार्यकारी अभियंता यांना आहे. त्यांनी काम केले मात्र याची



कधीही प्रसिद्धी त्यांनी केली नाही. गावकऱ्यांसाठी मागील २५ वर्षापासून अंभोरे धरणातून दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पाणी सोडण्यात येत आहे. हे सर्व शेतकरी, अंभोरे आणि पिंपरने ग्रामस्थ यांना माहित आहे.

भास्करराव खेमनर हे गावचे सरपंच असताना या दोन गावांसाठी या धरणातून एस्केप ठेवला गेला. त्यामुळे देव नदीमध्ये सहज पाणी येत आहे. या एस्केप मुळे पुढील अनेक वर्षांची सोय भास्कर खेमनर यांच्या सरपंच पदाच्या काळामध्ये या दोन्ही गावातील नागरिकांची करण्यात आली.

मात्र ज्यांना आता अंभोरे धरण माहित नाही अशी मंडळी पाणी सोडण्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे. उन्हाळ्यामध्ये पाणी सोडण्याची परंपरा कायम आहे. या कामाचे कुणीही श्रेय घेऊ नये असे आवाहन अंभोरे व पिंपरणे ग्रामस्थांनी केले आहे.

# अंभोरे धरणातून देवनदी बंधाऱ्यांत पाणी

## मंत्री राधाकृष्ण विखे व आ. अमोल खताळांचे ग्रामस्थांकडून आभार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन पिण्यासाठी व जनावरांसाठी तालुक्यातील अंभोरे धरणातून देव नदीवरील बंधाऱ्यात पाणी सोडण्यात यावे या ग्रामस्थांच्या मागणीची तात्काळ जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांनी दखल घेतली असून त्यामुळे जलसंपदा विभागाने शुक्रवारी( दि.५) अंभोरे धरणातून देवनदी बंधाऱ्यात पाणी सोडले आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी मंत्री विखे-पाटील व आमदार खताळ यांचे आभार मानले आहे.

अंभोरे परिसरात उन्हाच्या तीव्रतेमुळे पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर अंभोरे धरणातून देवनदीवरील बंधाऱ्यात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी महायुतीचे संपत खेमनर, कोंडाजी कडनर,.संतोष बलसाने, संदिप जगनर, सुरजित खेमनर, रामा बर्डे, देवराम खेमनर, मोहन खेमनर, भाऊसाहेब पाटोळे, खंडू नवले, रावसाहेब आभाळे यांच्यासह अंभोरे ग्रामस्थांनी मंत्री विखे पाटील तसेच आमदार खताळ पा यांच्याकडे केली होती.

त्यानुसार तात्काळ पाणी सोडण्याचे आदेश जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी अंभोरे धरणातून देवनदी बंधाऱ्यांत पाणी सोडले आहे. परिसरातील नागरिकांची पिण्याची तसेच जनावरांच्या पाण्याचीही गैरसोय दूर झाली आहे. उन्हाळ्याच्या काळामध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या संकटातून अंभोरेकरांना दिलासा मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# लक्ष विचलित...

पान १ वरून -

दरम्यान, रस्त्यावरील एका वळणावर पाठीमागून मोटारसायकलवर आलेल्या दोन अज्ञात तरुणांनी त्यांना थांबवत, बाबा, तुमचे पैसे आणि मोबाईल खाली पडला आहे, असे सांगितले. या बोलण्यामुळे शेटे यांचे लक्ष क्षणभर विचलित झाले. ते मागे वळून पाहत असतानाच चोरट्यांनी स्कूटीच्या हँडलला लटकवलेली पिशवी हिसकावून काही क्षणांतच घटनास्थळावरून पोबारा केला.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे शेटे हादरून गेले. पिशवी चोरीला गेल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ संबंधित व्यक्तींना संपर्क साधून धनादेशांवरील व्यवहार थांबविण्याची सूचना केली. त्यामुळे धनादेशांचा गैरवापर टळला आणि संभाव्य मोठे आर्थिक नुकसान वाचले.

या घटनेत १ लाख ७५ हजार रुपयांची रोकड तसेच सुमारे ३ लाख रुपयांचे सह्या केलेले दोन धनादेश चोरीला गेले आहेत. चोरट्यांनी बँकेपासूनच शेटे यांच्यावर नजर ठेवून नियोजनबद्ध पद्धतीने ही चोरी केल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.

याप्रकरणी सुरेश शेटे यांच्या फिर्यादीवरून संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) अंतर्गत दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल मुंढे पुढील तपास करीत आहेत.

# एस.टी महामंडळ अभियानात लोणी बसस्थानक विभागात अव्वल

## ५ लाख रुपयांचे पारितोषिक, वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत यांना 'लालपरी गौरवरत्न पुरस्कार'

युवावार्ता (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अत्यंत प्रतिष्ठेचे 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान' राबविण्यात आले होते. या राज्यव्यापी मोहिमेमध्ये नाशिक विभागातून लोणी बसस्थानकाने आपल्या उत्कृष्ट व्यवस्थापन, उत्तम प्रवासी सुविधा आणि उत्कृष्ट स्वच्छतेच्या जोरावर प्रथम क्रमांकाचे मानाचे पारितोषिक पटकावले आहे. या यशाबद्दल महामंडळाकडून लोणी बसस्थानकाला तब्बल ५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि भव्य स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



नाशिक येथे १ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिन सोहळ्यात हा बहुमान प्रदान करण्यात आला.

हा शानदार पुरस्कार सोहळा नाशिक प्रदेशचे व्यवस्थापक विजय गिते यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी नाशिकचे विभाग नियंत्रक श्री. क्षीरसागर आणि यंत्र अभियंता श्री. शेळके प्रामुख्याने उपस्थित होते. लोणी बसस्थानकाच्या वतीने हा मानाचा पुरस्कार आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड आणि लोणी बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत यांनी स्वीकारला. संपूर्ण बसस्थानक परिसर स्वच्छतेने परिपूर्ण असा दिसतो आणि प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्यात लोणी आगाराच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मोठे योगदान दिले होते.

याच सोहळ्यात लोणी बसस्थानकासाठी आणखी एक अभिमानास्पद क्षण पाहायला मिळाला. आपल्या कर्तव्यात सातत्य आणि उत्कृष्ट सेवा बजावल्याबद्दल लोणी बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत यांना राज्य परिवहन महामंडळाचा विशेष 'लालपरी गौरवरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. नाशिक प्रदेशचे व्यवस्थापक विजय गिते यांच्या हस्ते रावसाहेब पर्वत यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला. या दुहेरी मुकुटामुळे संपूर्ण लोणी परिसरात एसटी प्रशासनाचे नाव उंचावले आहे. लोणी बसस्थानकाने मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल आणि वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. राज्याचे जलसंधारण मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील तसेच अहिल्यानगरचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांनी या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. यासोबतच लोणी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक आणि लोणी बुद्रुक येथील ग्रामस्थांनी वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत व वाहतूक नियंत्रक कानकाटे, आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड या सर्वांचे अभिनंदन केले.

# मृत मराठा आंदोलकांच्या वारसांना सरकारकडून प्रत्येकी १० लाखांची मदत

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेल्या विविध आंदोलनांतील मृतांच्या वारसांना राज्य सरकारकडून (आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. आठ जिल्ह्यांतील ३४ व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपयांप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी राज्यातील विविध ठिकाणी झालेल्या आंदोलनांत एकूण ३०९ कार्यकर्त्यांचा मृत्यू झाला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने या मृत व्यक्तींच्या वारसदारांसाठी २७ कोटी ५० लाख रुपये मंजूर केले आहेत. यापैकी ३४ व्यक्तींच्या कुटुंबांना मदत मिळणे अद्याप बाकी होते.

अंतरवाली सराटी येथील मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी मृतांच्या वारसदारांना दिल्या जाणाऱ्या मदतीचा प्रश्न उपस्थित केला होता. यासंदर्भात मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उर्वरित वारसांना तातडीने मदत देण्याची ग्वाही दिली होती. राज्य सरकारने मागील दोन दिवसांत केलेल्या कार्यवाहीमुळे विविध जिल्ह्यांतील एकूण ३४ मृत व्यक्तींच्या वारसदारांना प्रत्येकी १० लाख रुपये, याप्रमाणे एकूण ३ कोटी ४० लाख रुपयांची मदत तातडीने मंजूर केली आहे. यामध्ये बीड जिल्हयातील १५, धाराशिव ५, परभणी ४, हिंगोली ४, नांदेड ३, जालना १, छत्रपती संभाजीनगर १ आणि लातूर १ अशा वारसांचा समावेश आहे, अशी माहिती उपसमितीचे अध्यक्ष विखे पाटील यांनी दिली.

आंदोलनादरम्यान सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता तातडीने करण्यात येत आहे. उपसमितीच्या बैठकीत सर्वच मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली असून, त्यावर वेगाने कार्यवाही सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# आम्ही पर्यावरण प्रेमीच्या पुढाकारातून मवेशीत हरित चळवळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - प्रतिनिधी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आम्ही पर्यावरण प्रेमी समूहाच्या पुढाकारातून व ग्रामपंचायत मवेशीच्या विशेष सहकार्याने पोलीस प्रशिक्षण केंद्र, मवेशी येथे भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात १०० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले, तर ग्रामस्थ व महिलांना ४०० रोपांचे मोफत वाटप करण्यात आले.

पर्यावरण रक्षण ही काळाची गरज असून केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता समाजाने स्वतः पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. वाटप करण्यात आलेली रोपे ग्रामस्थ आपल्या घरांच्या परिसरात व शेतजमिनीत लावणार असल्याने पर्यावरण संवर्धनाची ही चळवळ अधिक व्यापक होणार आहे.

कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच माजी सैनिक व निसर्गप्रेमी रमेश रखमाळे यांची प्रेरणा लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मवेशीचे सरपंच यमाजी भांगरे होते. यावेळी गटविकास अधिकारी अमरजी माने, वनपरिक्षेत्र अधिकारी दत्तात्रय पडवळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार, प्रा. नितीन तळपाडे, ग्रामविकास



अधिकारी सौ. एस. डी. देखमुख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना प्रा. नितीन तळपाडे म्हणाले, पर्यावरणाबरोबरच आपली बोलीभाषाही जपली पाहिजे. भाषा आणि निसर्ग हे आपल्या संस्कृतीचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. मनुष्याच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत झाडांची साथ त्याला लाभत असते. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही आज काळाची नव्हे तर अस्तित्वाची गरज बनली आहे. आम्ही पर्यावरण प्रेमी समूहाचे अध्यक्ष राहुल राऊत यांच्या नेतृत्वाखाली रमेश लेंभे, दत्ता कोंडार, रोहित मुठे, संजय देशमुख, दत्ता लांघी, हेमा कोंडार, संजय भांगरे, रामदास भांगरे, मेजर भरत कांबळे, गोविंद बांगर, आनंदा देठे, नामदेव कोंडार, कमल बांबळे, सुनिता कोंडार यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, महिला बचत गट, शैक्षणिक संकुल मवेशीचे प्रतिनिधी, युवक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# अकोले वनपरिक्षेत्रातील वनव्यांनी शेकडो हेक्टर जंगल खाक

## वनसंपदेसह वन्यजीवांचे मोठे नुकसान



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील भंडारदरा व राजूर वनपरिक्षेत्रात गेल्या सहा महिन्यांत लागलेल्या वनव्यांमुळे शेकडो हेक्टर जंगल जळून खाक झाले असून वनसंपदा, वन्यजीव, पक्षी, मधमाश्या आणि जैवविविधतेचे मोठे नुकसान झाले आहे. जागतिक पर्यावरण दिन साजरा होत असताना वनक्षेत्रातील या भीषण हानीमुळे पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अकोले वनपरिक्षेत्रात सामाजिक वनीकरण, प्रादेशिक, भवका, रोहयो आणि वन्यजीव विभाग असे विविध विभाग कार्यरत आहेत. वन विभागाच्या माहितीनुसार, अकोले प्रादेशिक क्षेत्रात गेल्या सहा महिन्यांत ७१ आगीच्या घटना घडून ९३ हेक्टर क्षेत्र जळाले आहे. वाशेरे घाट, ढग्या डोंगर, भागाड्या डोंगर, गर्दणी, मेहेंदुरी, अंबड, ढगेवाडी, पिसेवाडी, कळंब, लिंगदेव आणि ब्रह्मणवाडा परिसरात या घटना घडल्या.

वनपरिक्षेत्र अधिकारी आनंद पाटील यांनी सांगितले की, उंच व दुर्गम डोंगररचना, वेगवान वारे आणि एकाचवेळी अनेक ठिकाणी लागणाऱ्या आगीमुळे आग नियंत्रणात आणणे कठीण जाते. मात्र फायर वॉचर, ब्लोअर मशीन तसेच ग्रामस्थ व संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या मदतीने आग विझविण्याचे प्रयत्न केले जातात. भंडारदरा वन्यजीव विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित यांनी सांगितले की, रतनवाडी, उडदावणे, घाटघर आणि पांगरे परिसरात सुमारे १२ आगीच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. दरम्यान, काजवा महोत्सव ही संकल्पना वन विभागाची नसून पर्यटन विभागाच्या माध्यमातून सुरू झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पर्यटकांकडून नियमांचे पालन व्हावे यासाठी संवेदनशील भागात बॅरिकेड्स, पार्किंग व्यवस्था आणि रात्री १० वाजेपर्यंत प्रवेशाची मर्यादा घालण्यात आली आहे.

वनाधिकारी दत्तात्रय पडवळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अकोले प्रादेशिक क्षेत्रात ७१, रोहयो विभागात २३ आणि राजूर भवका विभागात २८ अशा एकूण १२२ वनव्यांच्या घटना घडल्या असून काही संबंधितांना नोटिसाही बजावण्यात आल्या आहेत. दरम्यान, जंगलात आग लागल्यानंतर काही वनाधिकारी फोन अथवा संदेशांना प्रतिसाद देत नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. यामुळे वन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पर्यावरणप्रेमी गणेश बोऱ्हाडे यांनी काजव्यांच्या अधिवासात वाढती गर्दी, कृत्रिम प्रकाशाचा वापर आणि पर्यावरणीय हानीबाबत राष्ट्रीय हरित लवादाकडे पाठपुरावा केला होता. मात्र या भूमिकेमुळे त्यांना स्थानिक पातळीवर दबाव व धमक्यांनाही सामोरे जावे लागल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वनव्यांच्या वाढत्या घटनांमुळे अकोले तालुक्यातील पर्यावरण आणि जैवविविधतेसमोर गंभीर संकट उभे राहिले असून वनसंवर्धनासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे.

# आता एसटी बसस्थानकांचा बदलणार चेहरामोहरा; दर चार तासांनी स्वच्छता

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या 'एसटी'च्या प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, स्वच्छ आणि दर्जेदार करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील सर्व प्रमुख बसस्थानके, एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहांची आता दर चार तासांनी अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने नियमित स्वच्छता केली जाणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून या राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ शुक्रवारी मुंबईतील परळ बसस्थानक येथे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे राज्यातील सर्व बसस्थानके आणि बसेस आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उपकरणांनी स्वच्छ करून ती प्रवासी-अनुकूल बनविण्याचा महामंडळाचा संकल्प असल्याचे सरनाईक यांनी यावेळी जाहीर केले.परळ बसस्थानक येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात स्वच्छता मोहिमेसाठी आणलेल्या आधुनिक यंत्रसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. याप्रसंगी बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एसटी ही केवळ एक वाहतूक सेवा नसून महाराष्ट्राच्या जनजीवनाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी एसटीने प्रवास करतात, त्यामुळे त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देणे ही महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सुरू झालेली ही मोहीम प्रवाशांना एक नवा आणि आनंददायी अनुभव देईल. ही स्वच्छता मोहीम एक दिवसापुरती मर्यादित नसून, ती सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. या मोहिमेच्या अंमलबजावणीवर आणि स्वच्छतेच्या दर्जावर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवली जाईल, यात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, अशी तंबीही त्यांनी दिली. पर्यावरण रक्षणाचा संदेश देत या स्वच्छता मोहिमेदरम्यान प्रत्येक बसस्थानकावर गोळा होणाऱ्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि पिशव्या कचऱ्यात न टाकता त्या संकलित केल्या जाणार आहेत.




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com









# साकूर परिसरात वादळी पाऊस व गारपिटीचे थैमान

## घराचे पत्रे उडाले, वाहतुकीला अडथळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील साकूर परिसरात शुक्रवारी दुपारनंतर झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपिटीने अक्षरशः धुमाकूळ घातला. अचानक बदललेल्या हवामानामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला असून अनेक ठिकाणी नुकसान झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

मांडवे बुद्रुक शिवारातील चौगुले वस्ती येथे राहणारे अश्पाक युनूस पठाण यांच्या घराचे पत्रे सोसाट्याच्या वाऱ्यामुळे उडून गेल्याची घटना घडली. पाऊस सुरू असताना पठाण कुटुंबीय घरातच होते. अचानक आलेल्या जोरदार वाऱ्याने घरावरील पत्रे हवेत उडाल्याने कुटुंबीयांची एकच धावपळ उडाली. त्यानंतर सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे घरातील संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे भिजून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

सुदैवाने उडालेली पत्रे दूरवर जाऊन पडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे पठाण कुटुंब संकटात सापडले असून प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, साकूर परिसरात सुमारे तासभर वादळी वाऱ्यासह गारपिटीचा जोर कायम होता. रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. साकूर-मांडवे मार्गावर एक मोठे झाड उन्मळून पडल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. तसेच अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटना घडल्या. या अवकाळी पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी शेतकरी वर्गात मात्र पिकांच्या संभाव्य नुकसानीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. गारपीट आणि वादळी वाऱ्याचा फटका फळबागा व पिकांना बसण्याची शक्यता असल्याने शेतकरी नुकसानाचा अंदाज घेत आहेत.

# दोन महिन्यांपासून फरार असलेल्या कोयता हल्ल्यातील मुख्य आरोपीला अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दोन महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देत फरार असलेल्या कोयता हल्ला प्रकरणातील मुख्य आरोपी सागर अशोक पगारे याला संगमनेर शहर पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ कलम ११९(१), ३(५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(अ) व १३५ अन्वये दाखल गुन्हा क्रमांक ३१४/२०२६ मध्ये सागर पगारे हा मुख्य आरोपी होता. दिनांक ५ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास तो जाणता राजा मैदानाजवळील बाबा टपरी येथे काही जणांसोबत उभा असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून संगमनेर शहर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीच्या मुसक्या आवळल्या. सागर पगारे याच्यावर यापूर्वीही काही गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासादरम्यान समोर आली आहे. दोन महिन्यांपूर्वी इंदिरानगर येथे सिद्धार्थ दारोळे हा तरूण एका कार्यक्रमात आपल्या सहकार्यांसमवेत असतांना मागील भांडणाचे कारणावरून सागर पगारे आणि त्याच्या साथीदारांनी त्याच्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केला होता. या हाल्ल्यात सिद्धार्थ हा गंभीर जखमी झाला होता. या घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. पोलिसांकडून त्याचा सातत्याने शोध सुरू होता. अखेर मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपीला अटक करण्यात यश मिळविले. ही कारवाई पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत, बाबा सातपुते, राहुल पांडे, विजय खुळे व आगलावे यांच्या पथकाने केली.

आरोपीच्या अटकेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, गुन्हेगारांवर प्रभावी कारवाई करणाऱ्या संगमनेर शहर पोलिसांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.










# निंबाळे येथे लाच मागणारा वीज कर्मचारी पकडला

## कारवाई टाळण्यासाठी ५० हजाराची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी )

संगमनेर- तालुक्यातील पिंप्री लौकी आजमपूर, तालुक्यातील निंबाळे येथे बाह्यस्त्रोत वीज कर्मचाऱ्याने तक्रारदाराच्या विरुद्ध वीज चोरीची कारवाई न करण्यासाठी महावितरणचे अधिकारी मेखे यांच्यासाठी ५० हजार रुपयांची लाचेची मागणी केली होती. त्यानुसार शुक्रवारी (दि.५) सव्वादोन वाजेच्या सुमारास अहिल्यानगरच्या लाचलुचपत विभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईत संबंधित कर्मचाऱ्याने लाचेची मागणी स्वीकारण्याचे मान्य केल्याने संगमनेर शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की निंबाळे येथील तक्रारदाराविरुद्ध वीज चोरीची कारवाई न करण्यासाठी बाह्यस्त्रोत कर्मचारी गणेश माधव दातीर (वय २४, ता. संगमनेर) याने निंबाळे कार्यालयातील अधिकारी मेखे यांच्यासाठी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करुन स्वीकारण्याचे मान्य केले होते. मात्र, तक्रारदाराने अहिल्यानगर लाचलुचपत विभागाकडे केलेल्या तक्रारीनुसार पथकाने केलेल्या कारवाईत लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे स्पष्ट झाले आहे.

याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांनी गणेश दातीर याच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजू आल्हाट हे करत आहे.













दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25